# प्रश्नपत्रिका मार्च 2014

**Time: 3 Hours** **Max. Marks: 80**

**प्र.१. अ) योग्य पर्याय शोधून पुढील विधाने पूर्ण करा.** ०४

१. एकदा मी पाऊस झालो, वाहत वाहत ________
(नदीत गेलो / ओढ्यात गेलो / समुद्रात गेलो / तलावात गेलो)

२. जेव्हा माणसं परिपूर्णरित्या मुक्त होतात, तेव्हाच ती अधिक जबाबदार, अधिक संयमी आणि ________
(व्यक्तिनिष्ठ होतात / कर्तव्यनिष्ठ होतात / समाजनिष्ठ होतात / ध्येयनिष्ठ होतात)

३. माझ्या वैयक्तिक जीवनाच्या निराशेतही ________
(मी आनंदात राहिले / जगण्याची आशा चिवट राहिली / इतरांना मदत करीत राहिले / मी जिद्दीने उभी राहिले)

४. निसर्गाचे शब्द किती ________
(सुंदर / विविध / प्रभावी / कठोर)

**आ) खालील वाक्यांतील रिकाम्या जागी कंसातील शब्दांपैकी योग्य शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहा.** ०३

१. 'मोकळा संवाद' ________ केला जातो अशी समजूत असते.
(गुरूशी / मित्रमंडळींशी / वृद्धांशी / तरुणांशी)

२. आम्ही देशभक्तांची मुले असेच ________ सारखे वाढलो व शिकलो.
(झाडा / कॅक्टस / ताडा-माडा / आंब्या)

३. स्वामीजी आपल्या शिष्यांसह त्य ________ बसले.
(गाडीमध्ये / मोटारीमध्ये / बग्गीमध्ये / रथामध्ये)

**इ) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.** ०३

१. 'सोव्हिएत लँड नेहरू पुरस्कार'नारायण सुर्वे यांना कोणत्या साली मिळाला?
२. ऋतुचक्रासोबत कोणाशी नाते सांगायचे?
३. केशवच्या बहिणीचे नाव काय आहे?

**प्र.२ अ) खालीलपैकी कोणत्याही एका वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण करा.** ०३

१. "मुलांच्या सुखातच बापाचं सुख असतं."
२. 'खरंच सांगतो, शांततेला आवाज असतो.'

**आ) खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ५० ते ६० शब्दांत लिहा.** ०९

१. स्वामी विवेकानंद व राजा रविवर्मा यांच्या भेटीस 'अपूर्व भेट' असे का म्हटले आहे?
२. ऋतुबदलाचा आनंद लेखिका कोणत्या प्रकारे साजरा करु इच्छिते?

३. ‘पन्हाळ्याचा दरगाह म्हणजे हिंदू-मुस्लिमांच्या एकतेचे प्रयत्न केलेल्या वलींचे स्थान आहे.’ असे लेखिका आशा आपराद का म्हणतात.

४. केशवच्या घरी गेल्यावर लेखकाच्या मनात कोणते विचार आले?

५. ‘तोच असतो मोठा ज्याचा मित्र पुस्तकराव’ असे का म्हटले आहे?

**प्र.३ अ) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.** **०३**

१. संत सोयराबाई यांच्या मते संसाराचे सुख कशा सारखे आहे?

२. कवी सूर्यकांत खांडेकर यांच्या मते चिमण्यांच्या ओठी काय दिसेल?

३. ‘गाव’ या कवितेत हिरवेगार पीक कोठे नाचत आहे?

**आ) खालील पद्यपंक्तींतील रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भरून पंक्ती पुन्हा लिहा.** **०३**

१. मातीलाही सुगंध यावा ________ भाकरीचा.
(ज्वारीच्या / कष्टाच्या / घामाच्या / बाजरीच्या)

२. ________ गंध मंद झरे सभोवार।
(सुमनांचा / सोनचाफ्याचा / पारिजातकाचा / निशिगंधाचा)

३. गावापासून केले दूर ________ पोटाने।
(टीचभरच्या / हातभरच्या / वीतभरच्या / बोटभरच्या)

**प्र.४. अ) खालीलपैकी कोणत्याही एका पद्यपंक्तीचा संदर्भ देऊन सरळ अर्थ लिहा.** **०३**

१. ‘अभ्रीची छाया काय साच खरी । तैसीच हे परी संसाराची।।’

२. ‘असा प्रलय व्हावा, समतेचं तुफान सुटावं विषमतेचे दगडगोटे उडून जावेत अस्मानात.’

**आ) खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ५० ते ६० शब्दांत लिहा.** **०९**

१. संत सेना महाराज यांनी संतांच्या भेटीने होणाऱ्या आनंदाचे वर्णन कसे केले आहे?

२. प्रलय होताना कोणकोणता बदल कवीला अपेक्षित आहे?

३. ‘आपण धरणी गं’ या कवितेत कवीने स्त्रीचे मोठेपण कसे वर्णन केले आहे?

४. ‘नभी फडफडे उंच तिरंगा, मनात गंगा, हिमनग रांगा’ असे कवयित्रीने का म्हटले आहे?

५. कवी ग.दि. माडगूळकर यांना देवाचे अस्तित्व कोठे-कोठे जाणवते?

**प्र.५ खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी ६० ते ७० शब्दांत लिहा. (कोणतेही दोन)** **०८**

१. स्वातंत्र्यचळवळीत भूमिगतांनी कोणकोणती विधायक कामे केली?

२. कोल्हापुरी गुळाचे वर्णन लेखकाने कसे केले आहे?

३. स्वत: झाड झाल्यावर जुई व चिनारला कोनता अनुभव आला?

४. ‘नातवंडांस पत्र’ या पाठातून आजी नातवंडांस कोणता संदेश देते?

**किंवा**

**खालीलपैकी कोणत्याही एका पाठाचा सारांश १०० ते १२० शब्दांत तुमच्या भाषेत लिहा.**

१. गावाची संस्कृती हे गावाचे व्यक्तिमत्त्व.

२. नातवंडांस पत्र.

**प्र.६. अ) खालील वाक्यांपैकी कोणतेही एक वाक्य लेखननियमांनुसार लिहा.** **०२**

१. बंदि असलेला हा प्रदेश केव्हातरी खूला होईल.

२. कश्टांशिवाय जिवन नाही.

**आ) खालील सामासिक शब्दांपैकी कोणत्याही दोन सामासिक शब्दांचा समास ओळखा.** **०२**

१. आजकाल

२. मातापिता

३. भाजीभाकरी

४. चतुर्वेद

**इ) कंसांतील सूचनेनुसार बदल करून कोणतीही दोन वाक्ये लिहा.** **०२**

१. जरा बाहेर येऊन बसता का?. (आज्ञार्थी करा)

२. तेथे खूप पडझड सुरू आहे. (उद्गारवाचक करा)

३. तुम्ही बाहेर जाऊन दंगा करा. (विधानार्थी करा)

**ई)** खाली कंसात दिलेल्या वाक्प्रचारांचा त्याखाली दिलेल्या वाक्यांत योग्य त्या ठिकाणी उपयोग करून वाक्ये पुन्हा लिहा. (कोणतेही चार) **०४**

(मन भरुन येणे, विवंचना असणे, सुन्न होणे, स्वप्नांचे महाल बांधणे, स्तंभित होणे, सोस असणे)

१. ताजमहालचे अप्रतिम सौंदर्य पाहून मुले आश्चर्यचकित झाली.

२. खूप कष्ट करूनही शेतकऱ्यांना पोटभर खायला मिळण्याची काळजी असते.

३. नागिणीचे शहाणपण ऐकून मुंग्यांचे अंत:करण उचंबळून आले.

४. आईने आपल्या मुलांबद्दल खूप स्वप्नं बघितली होती.

५. वनिताला इतरांना सहकार्य करण्याची खूप आवड आहे.

६. भयंकर अपघाताची बातमी ऐकून गावकऱ्यांना काही सुचेनासे झाले.

**प्र.७. अ) खालील उतारा वाचून त्यावर चार प्रश्न तयार करा.** **०४**

[प्रत्येक प्रश्नाचे उत्तर **एका** वाक्यात येईल असे प्रश्न तयार करावेत]

कृष्णाचे लहानपण गोकुळात गेले. तो सर्वांचा लाडका होता. तेथे शाळेत घालायचे म्हणजे मुलांच्या हातात काठी व पाठीवर धोंगडे देऊन त्याला 'गाई चरायला ने' म्हणून सांगायचे. गोकुळचा पाटील नंद म्हणजे गावचा राजा. कृष्ण पहिल्या दिवशी शाळेत गेला तेव्हा, आज राजाचा मुलगा आमच्याबरोबर येणार म्हणून सारी मुले आनंदाने नाचू लागली. त्यांच्याबरोबर कृष्ण गुरे राखण्यास गेला. जेव्हा काही वेळाने खाण्याची वेळ झाली तेव्हा प्रत्येकाने आपापली शिदोरी सोडली. त्यावेळीदेखील गोकुळातील मुले आपापली शिदोरी वेगवेगळी खात असत. श्रीमंत मुलांच्या शिदोरीत मेवामिठाई असे, गरीब मुलांच्या शिदोरीत मीठ-भाकरी असे. कृष्णकन्हैया पहिल्यांच दिवशी म्हणाला. "गड्यांनो, आपण सर्व एक ना? आपण वेगवेगळ्या शिदोऱ्या कशाला खायच्या? त्यापेक्षा आपण साऱ्या शिदोऱ्या एकत्र करू व सर्व मिळून खाऊ."

**आ) खाली दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे गोष्ट लिहा. योग्य शीर्षक देऊन तात्पर्य लिहा.** ०४

[**मुद्दे** : राजाचा आवडता विदूषक – राजाची करमणूक करण्याचे काम – एकदा विनोद करताना राजाचा अपमान – मुत्युदंडाचा हुकूम – माफीसाठी विदुषकाची वरचेवर विनवणी – व्यर्थ – एकच सवाल – मृत्यू कसा हवा? – विदुषकाचे चातुर्य – दिवसा किंवा रात्री मृत्यू नको – शिक्षा रद्द – तात्पर्य.]

**इ) पुढील विषयावर पत्र लिहा.** ०४

रमेश / रंजना कुलकर्णी, विद्यार्थी प्रतिनिधी, ज्ञानदीप विद्यालय, वरळी, मुंबई – ३१ येथून शाळेसमोरील नादुरुस्त रस्ता दुरुस्त करण्याबाबत विभागीय अधिकारी, मुंबई महानगरपालिका, मुंबई यांना विनंती पत्र लिहितो / लिहिते.

**किंवा**

**खालील विषयावर वृत्तान्त लिहा.**
शाळेत साजरा झालेला 'स्वातंत्र्यदिन समारंभ'

**किंवा**

**खालील विषयावर जाहिरातलेखन करा.**
आयुर्वेदिक औषधी तेलाची जाहिरात करा.

**प्र.८. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे १५० शब्दांपर्यंत निबंध लिहा.** १०

१. **मला पंख असते तर !**

[**मुद्दे** - पंख असावेत असे का वाटते ? – शहरातील रस्त्यांवरची रहदारी टाळता येईल – पटकन कोठेही जाता येईल – शाळेत वेळेवर पोहोचता येईल – पंखांमुळे कोणत्याही झाडावर जाऊन फळे मिळविता येतील – कोणी रागावले, भांडले तर उडून जाता येईल – आई-बाबा – शिक्षकांना – काळजी – पण आकाशात सुद्धा पक्षी चिडतील – मारतील – आपण एकटेच – बोध.]

२. **माझा भारत देश.**

[**मुद्दे** - प्राचीन देश – शेतीप्रधान – अनेक भाषा, धर्म, पंथ – एकत्वाची भावना – परंपरा – संस्कृती – इतिहास – थोर पुरुष/स्त्रिया – सुधारणा – वैज्ञानिक प्रगती – देशाविषयी प्रेम – अभिमान.]

३. **फुलाचे आत्मवृत्त**

[**मुद्दे** - जन्म एका उद्यानात – कळीच्या अवस्थेतील जीवन – फुलल्यावर झालेला आनंद – खट्याळ मुलाने तोडणे – थोडा वेळ स्वत:जवळ – कचऱ्यात फेकणे – देवळात स्थान नाही – व्यथा.]